नि.दि.दा.क्र.२६०/२०२२
नि.क्र.४३

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.७ करीता विधीज्ञ श्री.एस.टी. कोते यांच्या वतीने शपथेवर</u>**

**<u>सुरु</u> -**

११. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.७ हे मुळ वादीचे सख्खे भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी क्र.७ यांच्या आईचे नावे शिवबाई असे होते व त्या दि.१३/०७/२०१६ रोजी मयत झाल्या. हे म्हणणे खरे आहे की, शिवबाई यांच्या नावे शासनाने FL(II)No.48 व CLFLTOD No.44 असे दोन वाईन शॉपचे परवाने जारी केले होते. शिवबाईने तिच्या हयातीमध्ये वयोमानामुळे त्यांना दोन्ही वाईन शॉप चालविता येत नसल्याने प्रतिवादी क्र.१ व २ यांची परवानगी घेवून व आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन हे दोन्ही परवाने प्रतिवादी क्र.७ यांच्या नावे वर्ग केल्याचे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, शिवबाईने हे दोन्ही परवाने प्रतिवादी क्र.७ हिच्या नावे वर्ग केल्याचे मला माहित होते.

१२. हे म्हणणे खरे आहे की, मुळ वादीच्या चुलत बहिणीने नगर येथील न्यायालयात वि.दि.दा.क्र.१०३/२०११ हा दावा वाटपाकरीता दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यात मुळ वादी ही प्रतिवादी असून तिने त्या दाव्यात कैफियतीसह प्रतिदावा देखील दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती कैफियत आणि त्या प्रतिदाव्यात मुळ वादीने या दाव्यातील परवान्याबाबत जे काही कथन केले तसे कथन केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुळ वादीने तिच्या वडिलोपार्जित मिळकतींबाबत सन २००० मध्ये नोंदणीकृत हक्कसोडपत्र करुन दिलेले आहे.

१३. हे म्हणणे खरे आहे की, वादातील वर नमूद दोन्ही परवाने हे शिवबाईची वडिलोपार्जित मिळकत नव्हते. वादातील दोन्ही परवाने हे शासनाने दरवर्षाला नुतनीकरण पध्दतीने दिलेल्या होत्या, याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील वर नमूद दोन्ही परवाने हे शिवबाईची स्वतंत्र मिळकत होती. हे म्हणणे खरे नाही की, वादातील वर नमूद दोन्ही परवाने हे वडिलोपार्जित व एकत्र कुटूंबाचे असल्याने व त्यामुळे त्यामध्ये सर्वांचा हिस्सा असल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, कारण नसतांना खोटा दावा दाखल केला व प्रतिवादी क्र.७ यांच्याकडून आर्थिक लाभ मिळवून घ्यावा या उद्देशाने मी पुराव्याचे खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.11.04 16:10:49 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक ०४/११/२०२५